*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. XIII / Issue – III* *ISSN 2277-8063*

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषी धोरण वास्तव आणि समरस्या

**प्रा. डॉ. व्ही. एस. विनोदकर** MA.B.Ed., M.Phil, Ph. D., SET बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी ता. – पलूस जि- सांगली मो. नं. – 9970644281

---

## प्रस्तावना

संपूर्ण जगाला जगविणारी एक मूलभूत यंत्रणा म्हणजे शेती होय. शेती म्हणजे सर्व विकासाचा केंद्र बिंदू आहे. अर्थशास्त्रात शेती म्हणजे फक्त शेत जमिन नव्हे तर जे-जे नैसर्गिक आहे. त्या सर्वांचा समावेश शेतीमध्ये होतो. उदा. हवा, पाणी, सूर्यप्रकाश, जल, जंगल संपत्ती, पशु, पक्षी इ. प्रस्ध्दि निसर्गवादी विचारवंत ॲडम्स स्मिथ यांनी १७७६ ला Wealth of Nation या ग्रंथामध्ये मानवी श्रमाला व शेतीला अधिक महत्व दिले आहे. शेती (निसर्ग) शिवाय आपण जगू शकत नाही म्हणून सर्व सजिव व निर्जीव घटकांना जगविणारी निसर्गाकडून मानवाला मिळालेली एक मोफत देणगी म्हणजे शेती होय.

"रोटी, कपडा और मकान" या गरजा भागविण्यात शेतीचा सिंहाचा वाटा आहे. सध्या अन्नधान्य, कच्चामाल, रोजगार व उत्तम पर्यावरण देणारी उत्तम व्यवस्था म्हणजे शेती आहे. प्राचिन काळापासून आज तागायत शेतीचे महत्व कायम आहे व भविष्यात ही तसेच राहणार आहे.

भारतातील अनेक विचारवंतानी आपल्या विचारात शेतीला अधिक महत्व दिले आहे. उदा. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इ.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक उत्तम कृषीतज्ञ, अर्थतज्ञ, शिक्षणतज्ञ, जलतज्ञ, पत्रकार, संपादक, वकिल, कायदेपंडीत, प्रशासक, लेखक, कुशल संघटक, घटनाकार व समाजसुधारक होते. त्यांच्या आचार, विचार व कृती चा आधार घेतल्या शिवाय एक ही पाऊल पुढे टाकता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

## १.१ शोध निबंधाची उदिष्टे :

शोध निबंध लिहिताना खालील उद्दिष्टे डोळ्या समोर ठेवून लेखन केले आहे.

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शेती संदर्भात मांडलेल्या विचाराचा आढावा घेणे

२) डॉ. आंबेडकर यांनी मांडलेल्या कृषी विषयक धोरणाचा व तत्कालीन परिस्थितीचा अभ्यास करणे.

३) तत्कालीन परिस्थितीत शेतीची उत्पादक्ता व शेतक-याची आर्थिक, सामाजिक परिस्थिती याचा अभ्यास करणे.

४) धारण क्षेत्राचा आकार व वारसाहक्क याचा शेतीच्या विकासावर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

## १.२ गृहितके :

१) शेती क्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा कमी होत असला तरी शेतीचे महत्व कायम आहे.

२) डॉ. बाबासाहेबांचे कृषीधोरण आज ही प्रेरणादायी ठरत आहे.

३) केवळ लहान धारण क्षेत्रामुळे शेतीची उत्पादकता घटत नाही तर याला अन्य घटक ही जबाबदार आहेत.

४) शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलत आहे.

५) पडीक जमिन लागवडी खाली न आणता बिगरशेती क्षेत्र करण्याची प्रवृत्ती वाढली आहे.

## १.३ संशोधनाची अभ्यास पध्दती :

शोध निबंधाची मांडणी करताना दुय्यम साधन सामुग्रीचा वापर अधिक केले आहे. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा संदर्भग्रंथ, इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या माहितीचा, दै. वर्तमानपत्रात डॉ. आंबेडकर यांच्या विचारावर आधारित प्रकाशित झालेल्या लेख, अग्रलेख व विविध लेखकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर लिहिलेल्या पुस्तकातील माहितीचा वापर करुन वस्तुनिष्ठपणे विचार मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.४ शोध निबंधाची मर्यादा :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महामानव कृषीतज्ञ, अर्थतज्ञ, शिक्षणतज्ञ, कायदेपंडीत, समाजवादी, समतावादी, मानवतावादी, राष्ट्रवादी, ज्ञानसूर्य होते. ते ज्ञानाचा महासागर होते त्यांचे कृषीविषयक धोरण म्हणजे महासागरातील एक थेंब म्हणावे लागेल माझ्या शोध निबंधात कृषीविषयक धोरणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

## १.५ मानवी जीवनात शेतीचे महत्व :

शेतीला मानवी जीवनाचा पाया म्हणतात. अर्थ व समाज व्यवस्थेचा कणा म्हणतात प्राचीन काळी अग्नीचा शोध, चाकाचा शोध, शेतीचा शोध व नंतरच्या कालावधीत लागलेला पैशाचा शोध महत्वाचा मानला जातो. पण ज्या प्रमाणे पृथ्वी रात्र-दिवस सूर्याभोवती फिरते त्याप्रमाणे संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था शेती भोवती फिरत असते. कारण अर्थशास्त्रात

फक्त शेतजमिनीला शेती संबोधले जात नाही तर ज्या गोष्टी मानवाने निर्माण केलेल्या नाहीत जे मानवाच्या हितासाठी, कल्याणासाठी निसर्गताच उपलब्ध आहे. त्या सर्वांना शेती म्हणतात. उदा. भूगर्भातील खनिजे, भू-पृष्ठावरील घटक व पर्यावरणातील घटक यांचा यामध्ये समावेश होतो.

अर्थशास्त्राचे जनक ॲडम्स स्मिथ यांनी Wealth of Nation (१७७६) या ग्रंथात जे. जे. नैसर्गिक असते ते मानवाच्या हितासाठीच असते असे म्हटले आहे. तर निसर्गवादी विचारवंत डॉ. कवेने यांनी संपती संचलनाचा सिध्दांत मांडताना संपत्तीची सुरुवात शेत जमिनत होते व त्याचा शेवट ही शेतीतच होतो असे म्हटले होते. थोडक्यात सर्व संपत्तीचे उगमस्थान शेतीच आहे हे विसरुन चालणार नाही.

बदल हा समाजाचा स्थायी स्वभाव आहे. प्राचीन काळापासून आधुनिक काळा पर्यंतचा इतिहास पाहिल्यास शेतीचे महत्व कायम आहे. पण शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोण मात्र बदलत आहे. याला अनेक कारणे आहेत उदा. प्राथमिक क्षेत्र, व्दीतीयक्षेत्र व तृतीय क्षेत्राचा विचार केल्यास प्राथमिक क्षेत्राच्या तुलनेत अर्थव्यवस्थेत व्दीतीय व सेवा क्षेत्राचे महत्व वाढत आहे. सध्या राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा वाढत आहे. सध्या राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा १५%, उद्योगाचा ३२% व सेवा क्षेत्राचा वाटा ५७% इतका आहे. पण अजून ही शेती क्षेत्रातील रोजगाराचा वाटा मात्र ६०% आहे. उद्योग,व्यापार, वहातूक, दळणवळ, शिक्षण, आरोग्य यांच्या विकासाचा केंद्र बिंदू शेतीच आहे. कारण शेती मानवाला अन्न, वस्त्र, निवारा, कच्चामाल, रोजगार, परकिय चलन, उत्तम पर्यावरण देणारी एक उत्तम व्यवस्था आहे. ज्याप्रमाणे शरीरातून आत्मा निघून गेल्यास शरीराला शून्य किंमत उरते त्याप्रमाणे सर्व अर्थव्यवस्थेतून शेतीला बाजूला केल्यास अर्थ व समाज व्यवस्था मृतावस्थेत जाईल. म्हणून शाहू महाराज, महात्मा फूले, डॉ. आंबेडकर या सारख्या असंख्य महामानवानी शेतीला अधिक महत्व दिले होते.

**१.६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कृतीशिल विचारवंत :**

शाहू, फुले व आंबेडकर हे कृतीशिल विचारवंत होते. यांनी शेती संदर्भात फक्त विचार मांडले नाहीत तर विचाराला १००% कृतीची जोड दिली होती. बाबासाहेबानी शेतीचे महत्व, उत्पादन, उत्पादकता, धारणक्षेत्र, वीज, पाणी, भांडवल, उद्योग, बाजारपेठ, रोजगार यावर अभ्यासपूर्ण विचार मांडले होते. तसेच शेतीच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाची भूमिका कशी व कोणती असायला पाहिजे, शेतीवर कर किती व का आकारावे यावर आपले मत मांडले होते. तसेच शेतीमध्ये कोणती समस्या आहे. ती का निर्माण झाली आहे व त्यासाठी कोणकोणते उपाय केले पाहिजे या सर्वाची चर्चा त्यांनी मांडलेल्या विचारात दिसून येते पारंपारिक पध्दतीने केलेली शेती कधीच फायदेशीर ठरु शकत नाही तसेच शेती फक्त एक उदरनिर्वाहाचे साधन नसून तो व्यवसाय किंवा धंदा आहे हे समजल्या शिवाय शेतीचा विकास होणार नाही. तसेच शेतीच्या विकासा शिवाय इतर घटकाचा विकास अशक्य आहे. हे त्यांनी जाणले होते म्हणून शेतीच्या समस्येला व दु:खाला वाचा फोडण्याचे काम प्रामाणिक पणे बाबासाहेबानी केले.

**१.७ विव्दत्ता व नम्रता यामध्ये समन्वय :**

डॉ. बाबासाहेबांचे ज्ञान महासागरा एवढे होते. ते विश्वरत्न होते त्यांनी आपल्या बुध्दीच्या जोरावर दुनिया झुकविली होती. त्यांनी लाखो, करोडो अनुयायी निर्माण केले होते. या अनुयायीचा फायदा स्वता:च्या स्वार्थासाठी त्यांना एका क्षणात करुन घेता आला असता. पण त्यांनी तसे केले नाही कारण त्यांच्याकडे विव्दते बरोबर नम्रता व माणूसकी होती. ते स्वता अगरबत्ती प्रमाणे जळत राहून दुस-यांना सुगंध देण्याचा प्रयत्न केला.

त्यांची सर्व अंदोलने, चळवळ, सभा, न्याय मार्गाने चालू होती. उदा. १९२७ चे महाड येथील चवदार तळयाचे असेल, खोती पध्दती विरुध्द चळवळ असेल, अशस्पृता निवारण्याचे चळवळ असेल, पुणे करार बद्दल चर्चा असेल, सावकार किंवा सरकार विरोधी अंदोलन, सत्याग्रह असेल कधी ही जन समुदायाला भडकावून राजकारण केले नाही. सरकारी खाजगी मालमत्तेचे नुकसान होवू दिले नाही किंवा रस्त्यावर टायर जाळणे, गाड्या पेटविणे, इमारतीची तोड-फोड करणे असे घडवून न आणता समाजाला न्याय, स्वातंत्र्य, समता मिळवून देण्याचे महान कार्य केले आहे.

सध्याचे नेते, पुढारी, राजकारणी "खळक खट्याक" धोरण राबवून जाळपोळ, तोडफोड, हाणामारी करुन समस्या सोडविण्या ऐवजी समस्या अधिक गंभीर तयार करतात. म्हणून आज ही समाजाला शाहू, फुले, गांधीजी व आंबेडकर यांच्या विचाराची व कृतीची गरज आहे. कारण या महामानवानी समाज तोडण्या ऐवजी जोडण्याचे महान कार्य केले आहे.

**१.८ लहान धारणक्षेत्राचा आकार व वारसाहक्क बाबत विचार :**

भारत हा विकसनशील व कृषीप्रधान देश आहे. भारतात ५ लाख ५८००० पेक्षा जास्त खेडी आहेत. आज ही ६०% लोकांचे उदरनिर्वाहाचे साधन शेतीच आहे. भारतीय शेतीमध्ये अनेक समस्या आहेत. उदा. भारतीय शेतक-यामये

अज्ञान, व्यसन, अंधश्रध्दा, कर्जबाजारीपणा, शेतीवर लोकसंख्येचा अतिरिक्त भार, भांडवल टंचाई, विज, पाणी, यंत्र, बियाणे, बाजारपेठेचा अभाव, गतीशीलतेचा अभाव पण यामध्ये सर्वात मोठी समस्या म्हणजे शेतीचा लहान धारण क्षेत्राचा आकार होय.

डॉ. बाबासाहेब यांच्या मते सगळया विषमतेचे मूळ वारसाहक्काच्या कायदयात नाही तर वाढत्या लोकसंख्येचेचा अतिरिक्त ताण शेतीवर पडलेला आहे. त्यामुळे शेतीमध्ये विभाजन व अपखंडन ची परिस्थिती निर्माण झाली आहे. लोकसंख्या व शेतजमिन यांच्या व्यस्तमध्ये प्रमाण निर्माण झाले आहे. भारतीय शेती व शेतकरी विखुरलेले आहेत. बाबासाहेब यांच्या मते भारतीय शेतीची उत्पादकता, शेतक-याचे राहणीमान सुधारण्यासाठी वाढत्या लोकसंख्येला आळा घातले पाहिजे व बाबासाहेबांच्या मते शेतीक्षेत्रात धारण क्षेत्राचा आकार कमी होण्याचे कारण म्हणजे भारतीय लोकांच्याकडे शेती करण्या शिवाय दुसरा पर्याय शिल्लक नाही म्हणून नाइलाजास्तव शेतकरी, शेतमजुर शेती करत असतात. भारतात सिमांत शेतकरी, अल्पभूधारक, मध्यम भूधारक व मोठे शेतकरी असा वर्ग दिसून येतो. पण सिमांत व अल्पभूधारकाचे प्रमाण अधिक आहे. उदा. १ एकर, १/२ एकर, २ एकर, २.५ एकर शेती असणा-या शेतक-याचे प्रमाण अधिक आहे. ही जर समस्या सोडवायची असेल तर देशात लघु व मध्यम उद्योगांची संख्या वाढविली पाहिजे. त्यामुळे शेतीवरील अतिरिक्त लोकसंख्या उद्योगाकडे वळून अर्थचक्र तयार होईल.

उदा. शेतीवरील लोकसंख्या कमी झाल्याने □ उत्पादन वाढेल □ कच्चामाल वाढेल □ उद्योगधंदे वाढतील □ रोजगार वाढेल □ उत्पन्न वाढेल □ राहणीमान वाढेल □ बचत वाढेल □ भांडवल वाढेल □ गुंतवणूक वाढेल □ यामुळे पुन्हा उद्योगधंदे वाढतील.

विभाजन व अपखंडन यावर उपाय म्हणून भारतीय शेतक-यांनी सहाकर शेती, समुदायिक शेती, विस्तारीत शेतीचा प्रयोग करण्यास हरकत नाही. लहान धारण क्षेत्राच्या आकारावर अत्याधुनिक यंत्राचा/तंत्राचा वापर समाधानकारक करता येत नाही. शेती शास्त्रशुध्द पणे करता येत नाही. शेती आदानांचा योग्य वापर करता येत नाही. असे त्यांचे मत होते.

**१.९ खोती पध्दतीचे निमूर्लन :**

भारतीय शेतीमध्ये अनेक समस्या आहेत. उदा. सावकारी पध्दत, जमिनदार पध्दत, मध्यस्थ पध्दत, खोती पध्दत, अस्तित्वात होती ब्रिटिश काळात कोकणातील रायगड, कुलाबा, रत्नागिरी, मालवण येथे खोतलोक ब्रिटिश सरकारचे हस्तक होते. खोत लोक आपल्याच शेतकरी बांधवावर अन्याय, अत्याचार करत होते. रयतवादी पध्दतीत जो प्रत्यक्ष शेतजमिन कसतो त्याच्याकडून मनमर्जी प्रमाणे शेतसारा वसूल करण्याचे काम खोत लोक करत होते. खोत म्हणजे एका अर्थाने सुलतान होते. शेतीतून उत्पन्न कमी असो किंवा जास्त शेतसारामात्र दामदुप्पट गोळा करुन ब्रिटिश तिजोरीत भरण्याचे काम खोत करत होते. वेळ प्रसंगी शेतक-यांच्या जमिनी बळकावण्याचे काम करत होते. थोडक्यात खोत लोक महसूल गोळा करण्यासाठी साम, दाम, दंड, भेद या नितीचा अवलंब करत होते.

या पध्दती विरोधात बाबासाहेबानी आवाज उठविला होता. १९३७ मध्ये खोती पध्दत निमुर्लनाचे विधेयक विधिमंडळासोमर मांडले होते. १९३८ पासून अन्यायकारक खोती पध्दत बंद झाली.

**१.१० सरकारने बघ्याची भूमिका घेवू नये :**

डॉ. बाबासाहेब हे स्पष्ट वक्ते होते. शेतीचे, शेतक-याचे, खरोखर प्रामाणिक पणे कल्याण करायची इच्छा सरकारची असेल तर सरकारने बघ्याची भूमिका घेवू नये असे त्यांचे मत होते. कारण जनतेचे कल्याण करणे ही जबाबदारी सरकारची असते. शेतीच्या विकासासाठी शेतीचे राष्ट्रीयकरण करावे, शेतीला राष्ट्रीय उद्योग म्हणून घोषीत करावे. शेतीचे उत्पन्न प्रत्यक्ष कर प्रणालीत आणावे, कमी उत्पन्न – कमी कर, जास्त उत्पन्न – जास्त कर आकारावे, सरकारचे कर विषयक धोरण लवचिक असावे, शेतीला कमी व्याज दराने कर्ज पूरवठा करावा, शेतीला वीज, पाणी पूरवठा, उत्तम बियाणे, खते, यंत्र, सरकारने पूरवावे यामुळे मध्यस्थाचे व सावकाराचे उच्चाटन होईल असे त्यांचे मत होते. लोकसंख्या नियंत्रणात आणून पडिक जमिन मोठ्या प्रमाणावर लागवडी खाली आणावी असे त्यांचे मत होते.

**१.११ शेतीच्या समस्या :**

सध्याचे धोरण कर्ते शाहू, फुले, आंबेडकर यांची नावे आपल्या भाषणाला शोभा यावी म्हणून वापरतात. राजकारणी लोक त्यांचा उपयोग कडीपत्याच्या पाना प्रमाणे करतात व फेकून देतात

धोरण कर्त्यानी फक्त त्यांच्या नावांचा वापर न करता त्याचे विचार व कृती आमलात आणल्यास शेतीच्या समस्या सोडविण्यास वेळ लागणार नाही.

१) सध्या शेतीमध्ये अज्ञान व भिती पोटी सहकार शेतीचा किंवा

सामुदायिक शेतीचा प्रयोग यशस्वी झाला नाही.

२) शास्त्रीय पध्दतीने शेती केली जात नाही.

३) पडीक जमिन लागवडी खाली न आणता झटपट श्रीमंत होण्यासाठी NA प्लॉट पाडून गब्बर होण्याची प्रवृत्ती वाढल्याने अन्नधान्य व च्चामालाची टंचाई निर्माण होत आहे.

४) आज ही ८२% शेती निसर्गावर व १८% शेती जल सिंचनावर अवलंबून आहे.

५) शेतमालाला योग्य दर व योग्य बाजारपेठ मिळत नाही.

६) सुशिक्षित तरुण शेतीकडे वळत नाहीत

७) पुर व दुष्काळाचे नियोजन, व्यवस्थापन व्यवस्थित केले जात नाही.

८) पीकांचा आकृतीबंध बदलला जात नाही.

९) शासनाकडून शेतक-याला प्रोत्साहन मिळत नाही.

१०) शेतमालाची आयात/निर्यात धोरण अभ्यासपूर्ण केली जात नाही.

११) शेती संदर्भात सरकारच्या विचार व कृतीत एक वाक्यता दिसून येत नाही.

**संदर्भ साहित्यचा वापर :**

१) इंटरनेटवरील उपलब्ध माहितीचे संकलन

२) महार आणि त्याचे वतन – डॉ. बाबासाहेब आंबेडकर – नागनालंदा प्रकाशन पान – ११

३) चैत्यभूमी महास्मृती ग्रंथ – संपादक राम घोडेस्वार – बहुजन साहित्य प्रसार केंद्र नागपूर – पान – ११६

४) आर्थिक विचारवंताचा इतिहास डॉ. जे. एफ. पाटील – फडके प्रकाशन पान – ४०

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार दर्शन – संपादक प्रा नागोराव कुंभार – पान नं -३६

६) दैनिक सकाळ- १४ एप्रिल २०२३, २०२४ मधील अग्रलेख